# मुंबईत 'भारत बंद'चा फज्जा




**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: शेतकऱ्यांचे हितकर्ते म्हणून बोंबा मारत काही राजकीय पक्षांनी 'भारत बंद' पुकारला असला, तरी मुंबईत 'भारत बंद'ला समर्थन मिळाले नाही. मुंबईत टॅक्सी-रिक्षा नेहमीप्रमाणे धावत होत्या. 'बेस्ट' बसेस, तर ८५ टक्क्यांहून अधिक संख्येने रस्त्यावर उतरल्या होत्या. त्यामुळे मुंबईत बंदचे परिणाम जाणवले नाहीत. शिवसेनेचे वर्चस्व असलेल्या काही ठिकाणी जबरदस्तीने दुकाने बंद करायला लावल्याचे सांगण्यात आले.

दिल्लीत सुरु असणाऱ्या शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी पुकारण्यात आलेल्या 'भारत बंद'ला मुंबईत फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मुंबईच्या रस्त्यांवर सकाळपासूनच वाहनांची वर्दळ नेहमीप्रमाणे दिसत होती. 'बेस्ट' बसेस, टॅक्सी आणि रिक्षा रस्त्यांवर नेहमीप्रमाणे धावत होत्या. मोनो-मेट्रोही त्यांच्या वेळापत्रकानुसार धावत होत्या.

'बेस्ट' प्रशासनाने यापूर्वीच 'भारत बंद' आंदोलनात सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे सुरक्षेचा उपाय म्हणून 'बेस्ट'च्या बसेस लोखंडी जाळ्या लावून रस्त्यावर उतरवण्यात आल्या होत्या, तर दुसरीकडे मुंबईतील टॅक्सी संघटनेकडूनही सेवा सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मुंबईच्या रस्त्यांवरील वर्दळ नेहमी प्रमाणे होती. दुकानेही बहुतेक ठिकाणी चालू होती. मात्र, शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या अनेक ठिकाणी दुकाने बंद ठेवण्यात आली होती.

कोरोनामुळे आधीच सहा महिने सारे व्यवहार ठप्प होते. त्यामुळे हातावर पोट असणाऱ्या मुंबईकरांना घर कसे चालवायचे याची चिंता अद्यापही आहे. मुंबईकरांना 'बंद' आता नको आहे. त्यामुळे मुंबईतले व्यवहार सुरळीत होते. मात्र लालबाग, काळाचौकी, परळ, वरळी, प्रभादेवी, शिवडी, लोअरपरळ आदी शिवसेनेचा प्रभाव असलेल्या भागात बाजार, दुकाने बंद ठेवण्यात आली. पश्चिम उपनगरांत काही ठराविक ठिकाणी बंदला प्रतिसाद मिळाला.

'बेस्ट' संघटनांनी आधीच भारतमध्ये सहभागी होणार नसल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार बससेवाही नेहमीप्रमाणे सुरु होती. मात्र सुरक्षेचा उपाय म्हणून 'बेस्ट'च्या बसेसना लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या होत्या. रिक्षा, टॅक्सीही नेहमीप्रमाणे सुरु राहिल्याने चाकरमान्यांना वेळेत आणि सुरक्षित कामाच्या ठिकाणी पोहचता आले.

माल वाहतूकदारांनी बंदमध्ये सहभाग घेतल्याने मुंबईकडे येणारी भाजी, फळे, फुले तसेच दूध वाहतूक झाली नाही. त्यामुळे भाजीपाल्याचा तुटवडा जाणवण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### बँका नेहमीप्रमाणे सुरू

**सरकारी, खासगी, सहकारी बँकेचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरू होते. वाहतूक सुरु असल्याने बँक कर्मचाऱ्यांनीही वेळेत पोहोचून सेवा दिली. ग्रँण्टरोड येथील इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिक मार्केट नेहमीप्रमाणे सुरू होते. व्यवहारही सुरू होते. कोरोनाचा अनेक व्यापाऱ्यांना फटका बसला आहे. व्यवसायही मंदीत आहेत. त्यामुळे दुकाने सुरु ठेवण्यात आली.**

### ४,५२९ पैकी ४,४८६ बस रस्त्यावर

**मुंबईत अजूनही सर्वसामान्यांसाठी लोकल सुरु झालेल्या नाहीत. त्यामुळे सर्वसामान्यांना बससेवेचा आधार आहे. भारतबंदमध्ये बससेवा सुरू ठेवण्यात आल्या होत्या. एकूण ४,५२९ बसेसपैकी ४,४८६ बसेस रस्त्यावर धावल्या. बंदच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडला नसल्याचे 'बेस्ट' प्रशासनाकडून सांगण्यात आले.**

### रुग्णालये सुरळीत

**केईएम, शीव, नायर तसेच जेजे रुग्णालय, जीटी रुग्णालय, सेंटजॉर्ज रुग्णालय, कामा ऑलब्लेस हॉस्पिटल तसेच खासगी दवाखाने, नर्सिंग होम सुरू होते. जेजे रुग्णालय अत्यावश्यक सेवेत आहे. त्यामुळे येथे सर्व वैद्यकीय विभाग, ओपीडी सुरु असून रुग्णावर उपचार केले जात होते. मुंबईतील सर्व सरकारी, पालिकेची व खासगी रुग्णालये नेहमीप्रमाणे सुरु होती.**

## 'कोरोना'लसीसाठी शीतगृहाचे काम अंतिम टप्प्यात

### जानेवारीपर्यंत पूर्णत्वास नेण्याचे महापालिका प्रशासनाचे ध्येय



**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: कांजुरमार्ग (पूर्व ) येथे उभारण्यात येणाऱ्या कोरोना लसींसाठीच्या अत्याधुनिक शीतगृहाचे काम नव्या वर्षातील जानेवारी अखेरपर्यंत पूर्ण होणार आहे. या शीतगृहाचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर तेथे मुंबईकरांसाठी लसींची मोठ्या प्रमाणात साठवणूक करण्यात येणार आहे.

पालिकेच्यावतीने उभारल्या जाणाऱ्या शीतगृहाच्या जागेची मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी नुकतीच पाहणी करून तयारीकामांचा आढावा घेतला. कोरोना-लसीच्या साठवणुकीसाठी कांजुरमार्ग परिवार संकुलात अत्याधुनिक शीतगृहाचे निर्माण करण्यात येत आहे. यासाठी संकुलातील पाच माळ्यांपैकी तीन माळे हे शीतगृह केंद्रासाठी महानगरपालिकेतर्फे निश्चित करण्यात आले आहेत. बाहेरील वातावरणाचा लसींवर कुठल्याही प्रकारे परिणाम होऊ नये, यासाठी सदर जागेवर +२ डिग्री सेल्सियस ते +८ डिग्री सेल्सिअस तापमान राखत असलेली ४० क्युबिक मीटरची दोन उपकरणे बसविण्यात येणार आहे. त्यासोबतच -१५ डिग्री सेल्सिअस ते -२५ डिग्री सेल्सिअस तापमान राखत असलेले २० क्युबिक मीटरचे फ्रिजर बसविण्यात येणार आहेत. सदर शीतगृहात मुंबईला आवश्यक असलेला 'कोविड -१९' या लसीचा पुरेसा साठा ठेवण्याची क्षमता असणार आहे.

### सौरऊर्जेचा वापर

शीतगृहे सकाळी सौरऊर्जेवर व रात्री पारंपरिक वीजपुरवठ्यावर चालविण्यात येणार असल्याने विजेची बचत होऊन पर्यावरणाला हातभार लागणार आहे. अचानक वीजपुरवठा खंडित झाल्यास प्रत्येक युनिटनिहाय स्वतंत्र डीजे सेटची व्यवस्था करण्यात येणार आहे.

# सदोष इलेक्ट्रिक वायरिंगमुळे मुंबई शहरात आगीच्या घटना

## अग्निशमन दल, मुंबई महापालिका हतबल



**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: अनेक इमारतींभोवती इलेक्ट्रिक वायरिंगचे बेकायदा जाळे असल्याने मुंबईत आगीच्या घटना घडत आहेत. मात्र ऑडिटचे अधिकार नसल्याने मुंबई महापालिका आणि अग्निशमन दल हतबल आहेत.

मुंबईतील अनेक इमारतीत इलेक्ट्रिकचे बेकायदा वायरिंगचे जाळे पसरल्याचे अग्निशमन दलाच्या तपासणीत समोर आले आहे. मुंबईतील आगीच्या घटनांपैकी ८० टक्के घटना सदोष वायरिंगमुळे झाल्याचे उघडकीस आले आहे. मात्र इमारतीत वायरिंगचे ऑडिट करण्याचे अधिकार अग्निशमन दलाला नाहीत आणि पालिकेलाही नाहीत. त्यामुळे दुर्घटनेला आमंत्रण दिले जात आहे.

मुंबईत गेल्या काही वर्षांत आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. आग लागण्याच्या अधिकतर घटना बेकायदा वायरिंगमुळे घडत असल्याचे मुंबई अग्निशमन दलाच्या तपासात समोर आले आहे. मुंबईत उत्तुंग इमारती, टॉवर उभारले जात असून व्यावसायिक इमारतींचीही उभारणी झपाट्याने होत आहे. मात्र, या इमारतीत, टॉवर अथवा व्यावसायिक इमारतीत वायरिंग करताना कुठलेही नियोजन दिसून येत नाही. काही ठिकाणच्या इमारतीत तर अनधिकृत वायरिंगचे जाळे पसरत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. कुठल्याही इमारतीत, सोसायटीतील इमारतीत, व्यावसायिक इमारतीत करण्यात येणाऱ्या वायरिंगचे इंडियन इलेक्ट्रिक ॲक्टनुसार दर पाच वर्षांनी ऑडिट होणे गरजेचे आहे. मात्र, अग्निशमन दल व मुंबई महापालिकेकडे हे अधिकारच नाही. त्यामुळे मुंबईत गेल्या काही वर्षांत जितक्या आगीच्या घटना घडल्या त्यापैकी ८० टक्के आगीच्या घटना सदोष वायरिंगमुळे घडल्याचे मुंबई अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, आपण राहत असलेल्या घरातील वस्तूंची, सोने-चांदी याची काळजी घेतो, त्याप्रमाणे आपल्या जीवाची काळजी घेत घरातील इलेक्ट्रिक वायरिंगचीही काळजी घेतली पाहिजे, असा सल्ला अग्निशमनदलाच्या अधिकाऱ्यांनी दिला.

# महापालिकेने भाड्यापोटी एसटीला मोजले ४२ कोटी



**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: कोरोना काळात 'लॉकडाऊन' पुकारल्याने अत्यावश्यक सेवेच्या कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी मुंबई महापालिकेने एसटी महामंडळास ४२ कोटी, ३६ लाख, ७३ हजार, ३४६ रुपये मोजले आहेत.

'लॉकडाऊन' काळात २२ मार्च रोजी 'जनता कर्फ्यू' पुकारण्यात आल्यानंतर रेल्वे आणि बेस्ट बसेस सर्वसामान्यांसाठी बंद करण्यात आल्या. मात्र, तेव्हापासून अत्यावश्यक सेवेसाठी एसटी आणि बेस्ट बसेसद्वारे कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यात येत होती. एसटीच्या सुमारे ६४४ गाड्या अत्यावश्यक सेवेसाठी धावत होत्या. त्यामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळास दैनंदिन वाहतुकीसाठी इंधन व इतर अत्यावश्यक बाबींसाठी निधीची आवश्यकता असल्याची गरज लक्षात घेऊन मंडळाच्या मुंबई, ठाणे व पालघर या विभागांकडून चालविण्यात आलेल्या अत्यावश्यक सेवेतील फेऱ्यांपोटी २३ मार्च ते ३१ जुलैपर्यंतच्या वाहतुकीपोटी मुंबई महापालिकेने ३६ कोटी, ४४ लाख, ५२ हजार, ५ रुपये रक्कम एसटी महामंडळास प्रदान केली आहे. तसेच १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्टपर्यंच्या वाहतुकीच्या रकमेचे ५ कोटी, ९२ लाख, २१ हजार, ३४१ रकमेचे प्रदान महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळास करण्यात आले. एसटी महामंडळाने प्रत्येक किलोमीटरला ४४ रुपये या दराने एसटी बसेस मुंबई महापालिकेला दिल्या होत्या. १ ऑगस्टपासून ३१ ऑगस्टपर्यंत केलेल्या वाहतुकीचे भाडे १४ कोटी, ४५ लाख, ६८ हजार, ३३६ रुपये होते. मात्र, या कालावधीत अत्यावश्यक सेवा शासकीय कर्मचारी वगळता इतर प्रवाशांकडून प्रवासापोटी मिळालेले उत्पन्न ८ कोटी, ५३ लाख, ४६ हजार, ९९५ रुपये वगळून ५ कोटी, ९२ लाख, २१ हजार, ३४१ रुपये एसटीला प्रदान करण्यात आले.

**CFS**
**Centbank Financial Services Limited**
Wholly-owned subsidiary of Central Bank of India

**सेन्टबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि.**
**नोंदणीकृत कार्यालय:**
३ रा मजला, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया,
एमएमओ इमारत, ५५, एम. जी. रोड,
फोर्ट, मुंबई - ४००००१.

**दूरध्वनी: ०२२ २२६१ ६२१७ • फॅक्स: ०२२ २२६१ ६२०८ • ई-मेल: dts@cfsl.in**
**सीआयएन: U67110MH1929GO1001484 वेबसाईट: www.cfsl.in**

**जागेकरिता बोली/प्रस्तावाचे आमंत्रण**

सेन्टबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांना मुंबईमध्ये फोर्ट, नरीमन पॉईंट, लोअर परेल, दादर किंवा बीकेसीच्या जवळपास मान्यताप्राप्त वाणिज्य क्षेत्रामध्ये कार्यालयीन जागा हवी आहे. जवळपास १,८०० चौ.फु. ते २,००० चौ.फु. निव्वळ/कार्पेट क्षेत्रफळ जागेची आवश्यकता आहे आणि जागा सर्व मूलभूत सुविधायुक्त असावी. ब्रोकर किंवा मध्यस्थांना परवानगी नाही. नमुन्यासह अटी आणि शर्ती **वेबसाईट : https://www.cfsl.in/Debendure-Trustee.php** येथून डाऊनलोड कराव्या किंवा वरील पत्त्यावरून कार्यालयीन कालावधी दरम्यान प्राप्त करता येईल. प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक **२४ डिसेंबर, २०२०** रोजी सायं. ४.०० वा. आहे. कोणतेही कारण न दर्शविता कोणतीही/किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार कंपनी राखून ठेवीत आहे.

**दिनांक: ०८ डिसेंबर, २०२०** **(व्यवस्थापकीय संचालक)**

**MSEB HOLDING COMPANY LTD**
**Hongkong Bank Bldg. 4th Floor, M.G. Road, Fort, Mumbai- 400023.**
**CIN:U40100MH2005153649**
**E Tender Notice**

**E-Tenders are invited from eligible contractor for the work of (1) Tender Specification: No. EEC/Bandra/Tech/ Tender No.46/2020-21 (A) Name Of Work:** Annual Maintenance & Repairing of Water Pumps and, Repairing & cleaning of Fans installed at MSEBHCL's Offices, staff quarters & guest houses in Greater Mumbai **(B) Estimated Cost:** Rs.997367=00 **(C) E.M.D.** Rs.10000=00 **(D) Tender Fee:** Rs (1000.00+18%vat = 1180/-) **(E) Security Deposit** - 5% of contract value **(F) Time Limit:** 12 Months **(G) Sale Period**: 9.12.2020 to 16.12.2020 **(H) Submission Period**: 9.12.2020 to 17.12.2020 upto 14.00 hrs. The detail tender notice and documents for above works are available at etender portal of MSEDCL.
https://etender.mahadiscom.in/eatApp/online.
For details contact person Add. Executive Engineer (Dist.)
Tel. No. 26472131, Extn.No.3590/3578.
Etender support email id-support_etender@mahadiscom.in
For any corrigendum/updates referring to this tender please refer our website (www.mahadiscom.in) no correspondence at individual level to be done.
EXECUTIVE ENGINEER (CIVIL) Civil Division, MAHAVITARAN, Ground Floor, Prakashgad, Bandra (E), Mumbai - 400051.
**HO PR NO.66(2020)**

# सेवाभाव आणि करुणा यांमुळे 'कोरोना'विरुद्ध लढा यशस्वी

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे प्रतिपादन




**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: ''कोरोना संसर्गाच्या संकट काळात 'मानवसेवा हीच ईशसेवा' आहे असे मानून लोकांनी सेवाभाव व करुणा जागवली. त्यामुळेच अमेरिका व इतर देशांच्या तुलनेत भारताने कोरोनाचा मुकाबला अधिक चांगल्या पद्धतीने केला,'' असे प्रशंसोद्गार राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी येथे काढले.

भारतीय लोकांना भगवान बुद्धाची करुणेची शिकवण आहे. स्वामी विवेकानंद यांनी 'मानवसेवा हीच ईशसेवा' हा संदेश लोकांना दिला आहे. करुणा व सेवाभाव जगविल्यामुळेच कोरोना काळात भारतीयांनी संकटात सापडलेल्या आपल्या बांधवांना मदत करून कोरोनाविरुद्ध लढा यशस्वी केला,'' असे राज्यपालांनी सांगितले. भारतीय विकास संस्थान या सेवाभावी संघटनेतर्फे राजभवन येथे आयोजित कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'कोरोना योद्ध्यां'चा सन्मान करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

समाजासाठी काम करण्याची इच्छा अनेकांना असते. परंतु, प्रत्यक्ष काम करण्याची संधी फार कमी लोकांना मिळते. समाजासाठी काम करणाऱ्या हिऱ्यांना एकत्र आणून त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देणे हेदेखील महत्त्वाचे कार्य आहे, असे सांगून राज्यपालांनी भारतीय विकास संस्थानचे कौतुक केले. यावेळी राज्यपालांच्या हस्ते खा. गोपाळ शेट्टी, राज्य मानव आयोगाचे अध्यक्ष एम. ए. सईद यांसह विविध क्षेत्रातील नामवंत डॉक्टर्स, समाजसेवक व सेवाभावी संस्थांचा सत्कार करण्यात आला. डॉ. संजीव मेहता, 'वोक्हार्ट'चे संचालक डॉ. हुजेफा खोराकीवाला, डॉ. निमेश मेहता, डॉ. सुनीता, डॉ. श्वेता, के. के. सिंह, नितीन तिवारी, दीपक विश्वकर्मा, शुभम त्रिपाठी, शिवानी मौडगील, दिव्यांग रमेश सरतापे, डॉ. किशोर बाटवे, प्रभा विश्वमणी, डॉ. आगम वोरा, 'गायत्री फाऊंडेशन'चे डॉ उत्तम यांना यावेळी राज्यपालांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व तुळशीचे रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. भारतीय विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. योगश दुबे यांनी प्रास्ताविक केले तर किडनीविकारतज्ज्ञ डॉ. संदीप भुरके यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# आकांक्षित मागास जिल्ह्याचे रँकिंग सुधारल्याबद्दल राज्यपालांची ४ जिल्हाधिकाऱ्यांना कौतुकाची थाप

## वर्ग ३ ची रिक्त पदे भरण्याच्या सूचना

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी)**: राज्यातील गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद व वाशिम या चार आकांक्षित जिल्ह्यांनी २०१८च्या तुलनेत मानव निर्देशांकात प्रगती करून आपले एकूण मानांकन (रँकिंग) सुधारल्याबद्दल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी समाधान व्यक्त करताना संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कौतुकाची थाप दिली. विविध विभागांतील रिक्त पदांचा आढावा घेताना राज्यपालांनी सर्व आकांक्षित जिल्ह्यांना 'वर्ग ३'ची पदे तातडीने भरण्याचे निर्देश दिले.

'वर्ग ३'ची पदे रिक्त राहिली तर त्याचा विविध सेवांवर, विशेषतः आरोग्यसेवा क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो असे सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी



रिक्त पदे भरण्यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव सादर करावे, आपणही त्यात लक्ष घालू, असे राज्यपालांनी सांगितले. राज्यातील चार आकांक्षित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी राज्यपालांनी मंगळवार, दि. ८ डिसेंबर रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चर्चा करून जिल्ह्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. देशातील आकांक्षित जिल्ह्यांच्या प्रगतीचा अहवाल राष्ट्रपती महोदयांना नियमितपणे सादर करावा लागतो याकरिता राज्यातील आकांक्षित जिल्ह्यांची प्रगती जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन केले असल्याचे राज्यपालांनी यावेळी सांगितले. आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि व जलसंसाधन, आर्थिक समावेशन व कौशल्य विकास तसेच पायाभूत सुविधा या निर्देशांकांवर आकांक्षित जिल्ह्याने काय प्रगती केली, याची विस्तृत माहिती राज्यपालांनी यावेळी घेतली. नंदुरबारचे जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र भारुड, गडचिरोलीचे जिल्हाधिकारी दीपक सिंगला, उस्मानाबादचे जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर आणि वाशिमचे जिल्हाधिकारी षण्मुखराजन यांनी यावेळी विविध क्षेत्रातील जिल्ह्यांच्या प्रगतीची माहिती दिली.

**XMSE**
**METROPOLITAN STOCK EXCHANGE OF INDIA LTD.**
**NOTICE**

Notice is hereby given that the following Trading Member of the Metropolitan Stock Exchange of India Limited (the Exchange) has been declared a Defaulter under Byelaw 2(B) of Chapter XV and Expelled under Byelaw 2 of Chapter XV of the Byelaw of the Exchange.

| Sr. No. | Member Name | SEBI Reg. No. | Declaration Date |
|---|---|---|---|
| 1 | M/s Anugrah Stock & Broking Private Limited | INZ000200231 | November 26, 2020 |

The constituents of the aforementioned member are hereby advised to lodge claims, if any, in the prescribed claim form, against the above mentioned member within 3 months from the date of this notification. No claims filed beyond 3 months will be entertained by the Exchange against the above mentioned member, and it shall be deemed that no such claims exist against the said member. The claims filed against the above mentioned member will be dealt with in accordance with the Byelaws, Rules, Regulations and the procedures of the Exchange.
The maximum compensation limit per investor is Rs. 2 lakhs out of the Investor Protection Fund if found due and payable under the Byelaws, Rules and Regulations of the Exchange.
The claim form along with the relevant papers may be sent to the Defaulters' Committee Section of the Exchange at 'Metropolitan Stock Exchange of India Limited', Vibgyor Towers, 4th Floor, Plot No. C-62, G- Block, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai – 400098. The claim form may be downloaded from https:www.msei.in or may be obtained from the corporate office of the Exchange or the regional / branch offices of the Exchange.
The authorised persons affiliated with the above mentioned member are not authorised henceforth to deal in that capacity. The list of such authorised persons is available on http://www.msei.in/ . Investors may take note of the same.

For **Metropolitan Stock Exchange of India Ltd.**
*Sd/-*
Senior Vice President
Defaulters' Committee Section

Place: Mumbai
Date: December 9, 2020